॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/विवि /मनिस्प-४२/ 258 /२०२४ दि. ०५/१२/२०२४

**प्रति,**

**१) मा.प्राचार्य/ संचालक विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था**

**२) मा.संचालक, विभाग प्रमुख विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग**

विषय :- आंतर महाविद्यालय नियतकालिक अंक स्पर्धेबाबत...

महोदय/ महोदया,

विद्यापीठ संलग्नक्षेत्रात महाविद्यालयीन नियमित शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या साहित्य विषयक कलागुणांना वाव मिळून त्यांना अधिकाधिक प्रोत्साहन मिळावे, त्यांच्यातील साहित्यीक गुणांचा विकास होऊन भविष्यात प्रतिभासंपन्न साहित्यीक, लेखक, कवी, चित्रकार, संशोधन लेखक व विचारवंत निर्माण व्हावेत, या उद्देशाने विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागामार्फत अभ्यासेत्तर उपक्रम म्हणून आंतर महाविद्यालय नियतकालीक अंक स्पर्धा सुरु केलेली आहे. व त्यासाठी महाविद्यालयांनी दरवर्षी प्रकाशीत केलेले नियतकालिक अंकाच्या ५ प्रती विद्यापीठ कार्यालयात जमा करणेबाबत दरवर्षी कळविण्यात येत असते.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **शैक्षणिक वर्ष २०२३-२४** मध्ये प्रकाशित केलेले नियतकालिक अंकाच्या ५ प्रती सोबत जोडलेल्या नमुन्यातील माहिती आपल्या मुखपृष्ठावर (लेटरहेड) टंकलिखीत करुन **दि. ३१ डिसेंबर, २०२४** पर्यत किंवा तत्पुर्वी विद्यार्थी विकास कार्यालयात जमा कराव्यात, ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

5-12-2024

(डॉ. जयेंद्र दि. लेकुरवाळे)

**संचालक, विद्यार्थी विकास**

**सोबत :- विहित नमुना, स्पर्धेच्या अटी व नियम**

**प्रत :-**

१) मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
२) मा. कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
३) मा. प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
४) जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव - कृपया परिपत्रक वृत्तपत्र व उत्तम विद्या अंक यामध्ये प्रसिध्दी द्यावी.
५) पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव-कृपया परिपत्रकास संकेतस्थळावर प्रसिध्दी द्यावी.

D/Shivade/Magzeen

## -: आंतर महाविद्यालय नियतकालीक अंक स्पर्धा :-

★ पारितोषिके :-

१) उत्कृष्ट मुखपृष्ठ :-

अ) प्रथम - रु. ५,०००/-

ब) व्दितीय - रु. ४,०००/-

क) तृतीय - रु. ३,०००/-

(**टिप** :- मुखपृष्ठ विद्यार्थ्याने तयार केले असल्यास ५० % रक्कम महाविद्यालय व ५० % रक्कम विद्यार्थी यांना विभागून देण्याकरीता संबंधिताचे हमीपत्र आवश्यक राहील.)

**२) उत्कृष्ट अंक मांडणी :-**

अ) प्रथम - रु. ५,०००/-

ब) व्दितीय - रु. ४,०००/-

क) तृतीय - रु. ३,०००/-

**३) कथा, कविता, वैचारिक लेख व संशोधन लेख यांना रोख पारितोषिक :-**

(टिप :- मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू प्रत्येक माध्यमांकरीता स्वतंत्रपणे)

अ) प्रथम - रु. १,०००/-

ब) व्दितीय - रु. ७५०/-

क) तृतीय - रु. ५००/-

(**टिप** :- ३ मध्ये नमूद **उर्दू** माध्यमांच्या पारितोषिकासाठी कमीत कमी ५ प्रवेशिका असणे बंधनकारक राहील.)

**★ स्पर्धेसाठी अटी व नियम :-**

१) प्रत्येक भाषेतील कथा, कविता, वैचारिक लेख व संशोधन लेख यांना स्वतंत्रपणे प्रथम, व्दितीय व तृतीय अशी पारितोषिके तसेच उत्तेजनार्थ प्रमाणपत्रे देण्यात येतील.

२) नियतकालीक अंकामध्ये समाविष्ट होण्यासाठी सादर केलेल्या अंक मुखपृष्ट/कथा/ कविता/वैचारिक लेख /संशोधन लेख इ. निर्मिती बाबत विद्यार्थ्याने नियतकालीक प्रकाशन समितीला हमी देणे आवश्यक आहे.

३) स्पर्धेसाठी प्राप्त नियतकालीक अंका मधील कथा/ कविता/ वैचारिक लेख/ संशोधन लेख इ. साहित्य मांडणी निवड समितीला दर्जेदार नसल्याचे वाटल्यास त्या स्पर्धा प्रकारातील पारितोषिके तहकूब/ रद्द करण्याचा अधिकार निवड समिती व संचालक, विद्यार्थी विकास यांचा आहे.

४) नियतकालीक मुखपृष्ट स्पर्धेसाठी आलेल्या नियतकालीक अंकाचे मुखपृष्ट व सजावट विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतून तयार केली असेल तर मा.प्राचार्य/ संचालक/ विभाग प्रमुख यांनी विद्यापीठ कार्यालयास हमीपत्रासह अवगत करावे.

५) नियतकालीक उत्कृष्ट मुखपृष्ट पारितोषिक प्रथम, व्दितीय व तृतीय महाविद्यालय व विद्यार्थी यांना विभागून दिले जाईल.

६) स्पर्धेच्या अनुषंगाने काही निर्णय ऐनवेळी घ्यावा लागल्यास तो अधिकार संचालक, विद्यार्थी विकास यांना राहील.

७) संचालक, विद्यार्थी विकास यांनी मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेने घेतलेला निर्णय सर्वांना बंधनकारक राहील.

5-12-24

(डॉ. जयेंद्र दि. लेकुरवाळे)
**संचालक, विद्यार्थी विकास**

D/Shivade/Magzeen

## नियतकालिक प्रकाशन वेळी महाविद्यालयाने प्रसिध्द करावयाची माहिती :-

१. महाविद्यालयाचे नाव व पत्ता :- ------------------------------------
------------------------------------
------------------------------------

२. प्रकाशन वर्ष व महिना :- ------------------------------------

३. प्रकाशन स्थळ :- ------------------------------------

४. नियतकालिक नाव :- ------------------------------------

५. नियतकालिक अंक क्रमांक :- ------------------------------------

६. नियतकालिक मुद्रण संख्या (प्रति) :- ------------------------------------

७. मुख्य प्रकाशकाचे नाव व राष्ट्रीयत्व :- ------------------------------------

८. मुद्रकाचे नाव व पत्ता :- ------------------------------------

९. मुद्रकाचे राष्ट्रीयत्व :- ------------------------------------

१०. मुखपृष्ठ संकल्पना :- ------------------------------------

११. विद्यार्थ्याचे नाव व वर्ग ------------------------------------

---

### प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, वरील माहिती खरी असून नियतकालिक मुख्यपृष्ठ संकल्पना ----------- -------------- या विद्यार्थ्याची असून तो शैक्षणिक वर्ष -------------- मध्ये ----------------- वर्गात प्रवेशित आहे.

प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख
सही व शिक्का

D/Shivade/Magzeen-2014-15